॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION** website: srtmun.ac.in

**Phone: (02462) 215294** **E-mail: directorboee@srtmun.ac.in**

जा.क्र. परीक्षा/समन्वय/२०२४-२५/३००८ दिनांक :०५/११/२०२४

## महत्वाचे परिपत्रक-२

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालय,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: हिवाळी-२०२४ च्या परीक्षेसाठी सहकेंद्रप्रमुख (JCS) दक्षता पथक (Squad) व नियुक्त करण्यासाठी शिक्षकांचे नामनिर्देशन करणे बाबत.**
**संदर्भ: जा.क्र. परीक्षा/समन्वय/२०२४-२५/७०५८ दिनांक :२६/०९/२०२४ चे पत्र.**

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०२४ पदवी, पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा या पाच टप्यामध्ये अनुक्रमे दिनांक २६/११/२०२४, दि. ०२/१२/२०२४ दि. १०/१२/२०२४, १६/१२/२०२४ व १७/१२/२०२४ पासुन विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या परीक्षा केंद्रावर सुरु होणार आहेत.

हिवाळी-२०२४ पदवी, पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी प्रत्येक परीक्षा केंद्रावर सहकेंद्रप्रमुख (JCS) आणि दक्षता पथक (Suqad) नियुक्त करण्याच्या अनुषंगाने प्राध्यापकांची नावे पाठविणेबाबत यापूर्वीच कळविण्यात आलेले आहे. परंतु ब-याच महाविद्यालयाकडून याबाबत प्रतिसाद मिळालेला नाही. ज्या महाविद्यालयांकडून सहकेंद्रप्रमुख (JCS) आणि दक्षता पथक (Suqad) नियुक्तीसाठी प्राध्यापकांची नावे पाठविण्यात आलेली नाहीत अशा महाविद्यालयांनी दिनांक ११/११/२०२४ पर्यंत srtmuncoordinationsection@gmail.com या इमेलवर सहकेंद्रप्रमुख (JCS) आणि दक्षता पथक (Suqad) यांचे नामनिर्देशन करावे. **ज्या महाविद्यालयाकडून सहकेंद्रप्रमुख (JCS) आणि दक्षता पथक (Suqad) यासाठी नामनिर्देशन झालेले नसल्यास अशा महाविद्यालयातील कोणत्याही प्राध्यापकांना हिवाळी-२०२४ परीक्षेच्या कामासाठी विद्यापीठाव्दारे कार्यादेश निर्गमीत करण्यात येईल. ज्या प्राध्यापकांना हिवाळी-२०२४ च्या परीक्षेसाठी सहकेंद्रप्रमुख (JCS) आणि दक्षता पथक (Suqad) यासाठी विद्यापीठाव्दारे आदेश निर्गमीत करण्यात आल्यास त्यांना प्राचार्यांनी तत्काळ कार्यमुक्त करणे बंधनकारक राहील, कृपया याची नोंद घ्यावी.**

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव:
मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.